# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ

**(पूर्वीचे पुणे विद्यापीठ)**

## परिपत्रक क्र. १४६ /२०२६

**विषय : विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडणूकांद्वारे / स्वीकृतीद्वारे / नामनिर्देशनाद्वारे करण्यात येणाऱ्या नियुक्तीबाबत.**

या परिपत्रकाद्वारे सर्व संबंधितांना कळविण्यात येते की, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील विविध कलमांच्या तरतुदींनुसार 'विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडणूकांद्वारे किंवा स्वीकृतीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे' पात्र व्यक्तींची नियुक्ती केली जाते.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील कलम ६३ मध्ये सदस्यत्वाची समाप्तीबाबत खालील तरतूद नमूद केली आहे :

"या अधिनियमात किंवा त्याखाली करण्यात आलेल्या परिनियमांमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, ज्याबाबतीत विद्यापीठाचा अधिकारी म्हणून किंवा विद्यापीठाच्या कोणत्याही प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य म्हणून निवडून आलेली, नामनिर्देशित केलेली, नियुक्त केलेली किंवा यथास्थिती, स्वीकृत केलेली व्यक्ती, अशा पदाच्या, प्राधिकरणाच्या किंवा मंडळाच्या संबंधातील या अधिनियमाच्या संबंधित तरतुदींद्वारे किंवा त्याअन्वये विनिर्दिष्ट केलेल्या अधिकाऱ्यांच्या किंवा सदस्यांच्या कोणत्याही प्रवर्गातील असा अधिकारी किंवा सदस्य म्हणून अशा प्रकारे निवडून येण्यास, नामनिर्देशित केली जाण्यास, नियुक्त केली जाण्यास किंवा स्वीकृत केली जाण्यास पात्र असल्यामुळे ती **अशा प्रवर्गाची असण्याचे बंद झाल्याबरोबर लगेचच विद्यापीठाचा असा अधिकारी किंवा अशा प्राधिकरणाचा किंवा मंडळाचा सदस्य असण्याचे बंद होईल** आणि असा अधिकारी किंवा सदस्य म्हणून तिने आपले पद रिक्त केले असल्याचे मानण्यात येईल."

उक्त नमूद तरतुदींच्या अनुषंगाने असे निदर्शनास आले आहे की, विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांवर निवडणूकांद्वारे किंवा स्वीकृतीद्वारे किंवा नामनिर्देशनाद्वारे नियुक्ती झालेल्या सदस्यांपैकी अनेक सदस्य हे त्यांच्या मूळ पदावरून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत किंवा त्यांनी धारण करीत असलेल्या पदाचा राजीनामा दिला आहे किंवा विद्यापीठाच्या संलग्न महाविद्यालयात कार्यरत नाहीत किंवा काही कारणांमूळे त्यांचे मूळ पद धारण करीत नाहीत, मात्र सदर बाब ही संबंधित सदस्यांनी विद्यापीठास न कळविल्यामूळे ते विद्यापीठाच्या संबंधित प्राधिकरणावर सदस्य म्हणून कार्यरत आहेत. सदर बाब ही विद्यापीठ कायद्याचे उल्लंघन करणारी आहे.

सबब, उक्त नमूद बाब कळविण्याची जबाबदारी ही संबंधित सदस्याची तसेच संबंधित संस्थेची तसेच संबंधित महाविद्यालयाच्या प्राचार्य यांची असल्यामूळे सदर बाब विद्यापीठास तात्काळ कळविण्यात यावी, असे आवाहन सर्व संबंधितांना या परिपत्रकाद्वारे करण्यात येत आहे.

(प्रा. (डॉ.) प्रफुल्ल पवार)
**प्रभारी कुलसचिव**

गणेशखिंड, पुणे ४११००७.
जावक क्र. : सदनि/ ३८०
दिनांक : २० जुलै, २०२७